# थंडीतली झाडं




डिसेबर मध्ये USA ला आल्यावर सर्वत्र दिसतात झाडांच्या काड्या ! काही थोडी मात्र हिरवीगार झाडे आजूबाजूला असतात..

जी झाडं कोनिकल शेप मध्ये असतात,

त्यांचे खोड जाड आणि उंच असते, अशी झाडं डोंगरांच्या उतारावर दिसतात. त्यांना माऊंटन ट्रीज (Mountain trees) किंवा कोनिफेरस (Coniferous) असे म्हणतात. पाईन, देवदार, सिल्हरफर, spruce, cedar ही झाडं ख्रिसमस ट्री म्हणून जास्त वापरली जातात. कोनिफर झाडांना पाईन कोन असतात किंवा सुई सारखी needles असतात. आणि ती सदाहरित असतात.
त्यांच्या आकारामुळे त्यांवरचे पाणी खाली पडते किंवा झाडावर स्नोही कमी रहातो. स्नोमध्ये ही झाडे खूप छान दिसतात.
Norway spruce हे traditional ख्रिसमस ट्री आहे.
हिरवी ख्रिसमस ट्री आशा (होप) आणि जीवन (life) ह्याचे प्रतीक आहे. आणि सर्वत्र डेकोरेशन साठी लावलेले stars म्हणजे येशूच्या जन्माच्या वेळी आकाशात दिसलेल्या star चे प्रतीक असतात. इतरही १२ गोष्टी ह्या कसल्यातरी गोष्टींचे प्रतीक म्हणूनच सजावटीत वापरलेल्या असतात. घरात, ऑफिसमध्ये, मॉलमध्ये कृत्रिम ख्रिसमस ट्री लावून, वेगवेगळ्या प्रकारे ते झाड सजवतात.

ख्रिसमस मुळे सर्वत्र Holly tree च्या पानांचे डेकोरेशन  दिसते.. ती झाडे आधी फारशी पहाण्यात आली नव्हती, ती यावेळी पाहिली. १०/१५ फूट वाढणारी ही झुडपं असतात.

ह्या झाडांची पाने कातर कातर, काटेरी असतात. नेहमी हे झाड हिरवेगार असते. थंडीत त्याला छोटी फळे लागतात. बेरी म्हणतात त्यांना ! खूप प्रकारची झाडे असतात, आणि त्याप्रमाणे बेरींचे रंग पण वेगवेगळे असतात. पण ही फळे विषारी असतात. फक्त पक्षी खातात. छोटी मुले, आणि पाळीव प्राण्यांना ही फळे खाऊन धोका असतो. थंडीत जेव्हा इतर झाडांची पाने नसतात, तेव्हा पक्षी ह्या झाडांचा आसरा घेतात.



ह्या झाडांचे डेकोरेशन दरवाज्याला बाहेर लावलेले असते. Wreaths म्हणतात त्याला. ते दाराला लावल्यावर दुष्ट, अमंगल प्रवृत्तीपासून घराचे संरक्षण होते, आजारापासून मुक्तता मिळते. हे झाड दारात असले तर सुख, समृद्धी, शांती मिळते असा समज आहे.

ह्या झाडाला पाहून तुमची आतली शक्ती जागृत होते, आणि कठीण परिस्थितीला सामना देण्याची शक्ती मिळते अशीही एक समजूत आहे. Wreaths चा गोल आकार म्हणजे जणू आपले चिरंतन, आदि आणि अंत नसलेले जीवन आहे आणि holly leaves आणि berries म्हणजे येशू ख्रिस्ताचा काटेरी मुकूट आणि रक्त ह्यांचे प्रतीक आहे.
आपल्या इथे ही अनेक झाडांबद्दल अशा समजुती असतातच की!



डिसेंबरमध्ये अमेरिकाभर दिसणारे दुसरे सुंदर झाड म्हणजे poinsettia. हे कुंडीत जास्त दिसते, पण झुडुपासारखे किंवा त्याहून मोठेही काही ठिकाणी दिसते. एकट्या अमेरिकेत फक्त ६ आठवड्यांत जवळ जवळ ७० मिलीयन इतकी poinsettia ची झाडं विकली जातात. डेकोरेशन म्हणून ही झाडं दिसतात. कारण ह्या झाडाची वरची काही पानं लाल फुलांसारखी दिसतात. आणि खाली हिरवी डार्क पानं ह्यांमुळे ह्या झाडांचे सुंदर डेकोरेशन सर्वत्र  दिसते.



कधीकधी ही वरची पाने नारिंगी, गुलाबी, पोपटी, फिकट हिरवी, पांढरी किंवा मार्बल सारखीही असतात. असा रंग येण्यासाठी त्यांना ६ ते ८ आठवडे १४ तास डार्कनेस लागतो. म्हणजे जेव्हा थंडी सुरू होते, दिवस छोटा आणि रात्र मोठी होते तेव्हा त्यांची रंग बदलण्याची प्रक्रिया सुरू होते.



मात्र त्यांना दिवसाचा उजेडही हवा असतो. खालची पाने हिरवी असतात. ह्या रंगीत पानांच्यामध्ये पिवळ्या छोट्या फुलांचा झुपका असतो आणि ही फुलं unisex असतात म्हणजे एकतर मादी तरी असतात किंवा नर. कुंडीत ते २/३ महिने राहू शकते.



हे झाड मुळचे मेक्सिकोतले.. १८२० मध्ये अमेरिकेत आणले गेले. ते विषारी समजतात.
ह्या झाडाला थोडे पाणी लागते. आठवड्यातून एकदाही नीट घातले तर पुरते.
फांदी लावून किंवा पान सुध्दा देठापासून काढले तर ते लावूनही झाड येऊ शकते. पानातून आलेला चीक वाळला की पावसाळ्याच्या सुमारास ते लावले तर डिसेंबर पर्यंत रंग बदललेले झाड आपले घर सुशोभित करू शकते.

ही सर्व झाडं, डिसेंबर महिन्यातल्या स्नोमुळे डल झालेले वातावरण रंगीत करतात..

**….. चित्रा मेहेंदळे**